# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील ७ महानगरपालिकांकडे माहितीच्या अधिकारातील अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(१) ४२५ (१७-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जवळपास ७ महानगरपालिका प्रशासनांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (आरटीआय) अन्वये प्राप्त एकाही अर्जाला प्रतिसाद दिला नसल्याची माहिती “मंत्रालय मासिक सुधारणा अहवालातून” दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार, अहिल्यानगर, धुळे, जळगांव, लातूर, परभणी, सोलापूर या महानगरपालिकांनी आरटीआयचे सर्व अर्ज प्रलंबित ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभाग, वित्त विभाग, सहकार विभाग, महिला व बालविकास विभागातील माहितीच्या अधिकाराचे अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील माहितीच्या अधिकारातील प्रलंबित अर्ज त्वरित निकालात काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२६) : (१)** हे खरे नाही.

शासनामार्फत “मंत्रालय मासिक सुधारणा अहवाल” या नावाचा कोणताही अहवाल प्रसिध्द केला जात नाही.

(२) हे खरे नाही.

सदर महानगरपालिकांनी सन २०२४ या वर्षात निकाली काढलेल्या माहिती अधिकार अर्जांची संख्या पुढीलप्रमाणे आहे

| अ.क्र. | महानगर पालिकेचे नाव | एकूण अर्ज | निकाली अर्ज |
|---|---|---|---|
| १. | वसई-विरार | ७४४७ | ६५५८ |
| २. | अहिल्यानगर | ९५६ | ८९० |
| ३. | धुळे | ९६० | ५२८ |
| ४. | जळगाव | ७१३ | ५९१ |
| ५. | लातूर | ८४४ | ६७५ |
| ६. | परभणी | ६६१ | ६४१ |
| ७. | सोलापूर | ३५९२ | ३५९२ |

(३) हे खरे नाही.

सदर प्रशासकीय विभाग व त्यांच्या अखत्यारितील क्षेत्रिय कार्यालयांनी सन २०२४ या वर्षात निकाली काढलेल्या माहिती अधिकार अर्जांची संख्या पुढीलप्रमाणे आहे-

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्राप्त अर्ज | निकाली अर्ज |
|---|---|---|---|
| १. | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | १८२४१ | १६९११ |
| २. | वित्त विभाग | ४३८६ | ४२१३ |
| ३. | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | २२६४६ | २२३०० |
| ४. | महिला व बालविकास विभाग | ३६९६ | ३५५७ |

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-ठाण्यातील फॉरेन्सिक लॅबच्या चाचण्या वेळेवर होत नसल्याने सायबर गुन्हयांच्या तपासाला विलंब होत असल्याबाबत

**(२) ४९९ (२२-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाण्यातील फॉरेन्सिक लॅबच्या चाचण्या संथ गतीने होत असल्याने सायबर गुन्हयांच्या तपासाला विलंब असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व ठाण्यातील किती फॉरेन्सिक चाचण्याची लॅबमध्ये पाच वर्षात प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गंभीर दखल घेऊन मुंबई-ठाण्यातील फॉरेन्सिक लॅब सक्षम करुन निकाल त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०२६) :** (१) होय.

(२) मुंबई व ठाणे प्रयोगशाळांमधील सन २०२० ते २०२५ (जून अखेरीस) या कालावधीमधील एकूण

प्रलंबित प्रकरणांची संख्या अनुक्रमे ४७२७ व २०३९ इतकी असल्याचे न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाने कळविले आहे.
(३) संगणक गुन्हे विभागातील प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा प्रकल्प (Semi-Automated Processing Pendency Removal), मुंबई प्रयोगशाळेत माहे मार्च २०२५ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

संगणक गुन्हे विभागातील प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करणेकरीता २२० कंत्राटी पदे भरण्यास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औष्णिक विद्युत केंद्र दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना लॉटरी पध्दतीने काम देणेबाबत

**(३) ९२८ (२२-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील औष्णिक विद्युत केंद्र सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना लॉटरी पध्दतीने काम देणेसंदर्भात शासन निर्णय असूनही महानिर्मिती मध्ये सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी प्रधान सचिव, ऊर्जा विभागाकडे लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना रोजगार मिळण्यासाठी ऊर्जा विभागाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६३/ऊर्जा-५, दिनांक २६/०३/२०१५ अन्वये धोरण निश्चित केलेले आहे. सदर धोरण महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपन्यांनाही लागू करण्यात आलेले आहे.

महानिर्मिती कंपनीने सदर धोरण कंपनीमध्ये राबविण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे तयार करुन ती दिनांक २५/१०/२०१९ रोजीच्या परिपत्रका अन्वये लागू केलेली आहे.

तसेच, लॉटरी पध्दतीने कार्यादेश निर्गमित करण्याबाबतचे अधिकार मुख्य कार्यालय व क्षेत्रिय कार्यालयास महानिर्मितीच्या दिनांक ०१/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रदान करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिपनगर, भुसावळ (जि.जळगाव) येथील प्रकल्पासाठी सी.एस.आर. (CSR) निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(४) १५९५ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर, भुसावळ (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाअंतर्गत प्रकल्पाची किमंत १८०० कोटी रुपयांनी वाढली असून सदरचा खर्च भागविण्यासाठी सी.एस.आर. निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प दिपनगर, भुसावळ प्रकल्प अंतर्गत सी.एस.आर.निधी उपलब्ध करून देणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

कोविड महामारीमुळे प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करण्यात विलंब झाला असून त्याची किंमत वाढली आहे. मात्र त्या प्रमाणात CSR निधी वाढविण्याचे प्रस्तावित नाही.

वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक २७/११/२०१२ रोजीच्या पत्रान्वये १x६६० मे.वॅ. प्रकल्पास मंजूरी देण्यात आली असून रुपये १८.२० कोटी इतका निधी प्रकल्प क्षेत्राच्या ५ कि.मी. अंतराच्या परिघामध्ये प्रकल्प उभारणीचे काम सुरु असताना सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत कामांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. रुपये ३.६४ कोटी रुपये निधी प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रत्येक वर्षी सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत कामांसाठी खर्च करण्याच्या अटी व शर्तीवर मंजूरी देण्यात आली आहे.

आज पर्यंत १८.२० कोटी रुपये इतक्या खर्चाची कामे सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत (CSR) मंजूर करण्यात आली आहेत. त्यामधील रुपये ३.५९ कोटी इतक्या रक्कमेची कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली असून रुपये १४.४३ कोटी रक्कमेची कामे सुरु असून लवकरच पूर्ण होतील. तसेच उर्वरित कामांच्या निविदा मागविण्यात आल्या असून त्यास लवकरच कार्यादेश देण्यात येतील.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील इतर मागासवर्गीयांची स्वतंत्र जनगणना करण्याबाबत

**(५) १६८३ (२४-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ : तारांकित प्रश्न क्रमांक १७३०९ ला दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिहारप्रमाणेच राज्यातील इतर मागासवर्गीयांची स्वतंत्र जनगणना करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२२-०१-२०२६) :** (१), (२) व (३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सन २०२१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये मागास प्रवर्गातील लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्याची शिफारस या विषयाबाबत मांडलेला ठराव दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी सभागृहात चर्चा होऊन एकमताने संमत करण्यात आला. सभागृहाने संमत केलेला ठराव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी दिनांक १० फेब्रुवारी,

२०२० च्या पत्रान्वये सहसंचालक, महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना पाठविण्यात आला आहे. तसेच, दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजीच्या स्मरणपत्रान्वये याबाबत केलेली कार्यवाही महाराष्ट्र शासनास कळविण्याबाबत पुन्हा विनंती करण्यात आलेली आहे. तथापि, दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी मा.पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखालील राजकीय व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने जातींची गणना स्वतंत्र सर्वेक्षण म्हणून न करता आगामी सार्वत्रिक जनगणनेत जातीय गणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. संचालक, महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त कार्यालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयाकडून सार्वत्रिक जनगणनेसोबत करावयाच्या जातनिहाय जनगणनेबाबत निर्देश प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून पार पाडली जाईल.

---

## विदर्भ विकासाच्या पर्यटन धोरणाबाबत

**(६) २१४४ (२३-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विदर्भातील विकासाला चालना देण्यासाठी पर्यटन धोरण माहे ऑक्टोबर - २०२४ मध्ये जाहीर केले होते, पर्यटन धोरण अमलात आणण्यासाठी महसूल, ऊर्जा, पाणीपुरवठा, उद्योग, नगरविकास इ. ७ विभागांनी निर्णय घेवून अधिसुचना जारी करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात फक्त महसूल विभागाने निर्णय घेवून अधिसूचना जारी केली आहे ती या धोरणाला अमंलात आणण्यासाठी पुरेशी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात माहिती घेवून व सदर विविध विभागांसंदर्भात निर्णय घेवून सदर धोरणाला गती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (२६-०२-२०२६) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

राज्यातील पर्यटन क्षेत्रातील आर्थिक, भौगोलिक निसर्गसंपदा लक्षात घेवून व देशपातळीवरील राज्याचे परिवहन क्षेत्रातील जाळे, उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधा, हवाई वाहतूक व मिळणारा नागरिकांचा प्रतिसाद लक्षात घेता, राज्यातील पर्यटन स्थळांकडे असणारा प्रतिसाद, त्याकरीता पर्यटकांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी-सुविधा आणि राज्याच्या महसुलात आगामी १० वर्षाच्या कालावधीसाठी अंदाजे रुपये १.०० लक्ष कोटी इतकी नवीन खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे १८ लक्ष नवीन रोजगार निर्माण करणे याकरीता राज्याचे "पर्यटन धोरण २०२४" यास दिनांक १८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

"पर्यटन धोरण २०२४" अंमलबजावणीकरीता पात्र पर्यटन घटकांना वित्तीय आणि बिगर-वित्तीय सवलती / प्रोत्साहनांचा समावेश करण्यात आला आहे. पात्र पर्यटन घटकांना मुद्रांक व नोंदणी शुल्क सवलतीकरीता महसूल व वन विभागाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. तसेच, अतिरिक्त चटई क्षेत्र सवलतीकरीता नगरविकास विभागाने दिनांक ११/१२/२०२५ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे.

(३) "पर्यटन धोरण २०२४" अंतर्गत पर्यटन प्रकल्प घटकांच्या अर्ज छाननीनंतर मुद्रांक व नोंदणी शुल्क आणि अतिरिक्त चटई क्षेत्र यामध्ये सवलती देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात घरगुती वीज ग्राहकांना सवलतीची सुविधा देणारे वीज मीटर मोफत बसवून देणेबाबत

**(७) २१८० (२४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महावितरण कंपनीने विद्युत नियामक आयोगाकडे सादर केलेल्या प्रस्तावामध्ये घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेतील वीज वापरासाठीच्या दरात सवलत देण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सुविधा मिळण्यासाठी वीज ग्राहकाने कोणत्या वेळेला वीजवापर केला याची माहिती देणारी सुविधा घरगुती ग्राहकाकडे सध्या बसविलेल्या मीटरमध्ये नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन घरगुती वीज ग्राहकांना सवलतीची सुविधा देणारे वीज मीटर मोफत बसवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे,

महावितरण कंपनीद्वारे दिनांक ३०/११/२०२४ रोजी बहुवर्षीय वीजदर याचिका मा.वीज नियामक आयोगाकडे सादर करण्यात आली होती. घरगुती ग्राहकांना सौर तासादरम्यान वीज वापरावर १०% सवलत देण्याचा प्रस्ताव सादर केला होता.सौर तासांमध्ये उपलब्ध होणाऱ्या विजेचे दर स्वस्त असल्यामुळे मा.वीज नियामक आयोगाने सौर वेळेतील (सकाळी ९.०० ते सायं ५.००) वीज वापर वाढण्यास प्रोत्साहित करण्यासाठी टाईम ऑफ-डे (टीओडी) टप्पा आणि टीओडी वीज दराची (आकार/सवलत) पुनर्रचना केली आहे.

मा.वीज नियामक आयोगाने दिनांक २५/०६/२०२५ रोजीच्या वीजदर आदेशानुसार स्मार्ट मीटरचा पर्याय निवडणाऱ्या घरगुती ग्राहकांना सौर तासादरम्यान वीज वापरावर आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी ८० पैसे/युनिट व आर्थिक वर्ष २०२९-३० रुपये १.००/युनिट पर्यंत सवलत मंजूर केली आहे. त्यानुषंगाने सुधारित वीजदर दिनांक ०१ जुलै, २०२५ पासून लागू करण्यात आले आहेत.

सदर सुविधा मिळविण्यासाठी ग्राहकाने तासानिहाय वीज वापराची नोंद घेणारे स्मार्ट मीटर बसविणे गरजेचे आहे.
(३) केंद्र शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) महावितरणकडून संपूर्ण राज्यात घरगुती वीज ग्राहकांना तासानिहाय वीज वापराची नोंद घेण्याची सवलतीची सुविधा असलेले स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. महाराष्ट्रात असलेल्या एकूण वीज ग्राहकांपैकी आतापर्यंत ५९,८३,७६३ इतक्या घरगुती वीज ग्राहकांना महावितरण मार्फत स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून उर्वरीत घरगुती वीज

ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरु आहे. ग्राहकांना सध्याच्या प्रचलित पोस्टपेड पध्दतीनेच स्मार्ट मीटर मोफत बसविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल शहरामधे टिंबर मार्ट या ई. एच. व्ही. सबस्टेशनमध्ये २२०/३३/२२ के. व्ही. पावर ट्रांसफार्मर कार्यान्वित करणेबाबत

**(८) ४७४१ (१४-१२-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल शहराची वाढती विद्युत पुरवठा लक्षात घेता टिंबर मार्ट या ई. एच. व्ही. सबस्टेशनमध्ये २२०/३३/२२ के. व्ही. असे पावर ट्रांसफार्मर कार्यान्वित करण्याची मागणी लोकप्रतिनिधीकडून करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टिंबर मार्ट या ई. एच. व्ही. सबस्टेशनमध्ये २२०/३३/२२ के. व्ही. असे पावर ट्रांसफार्मर कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) २२०/३३ के.व्ही. टिंबर मार्ट उपकेंद्रातुन ३३/११ के.व्ही. सेक्टर-७, ३३/११ के.व्ही. सेक्टर-१५, ३३/२२/११ के.व्ही. कल्पतरु उपकेंद्र यांना स्वतंत्र ३३ के.व्ही. वाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे २२ के.व्ही. लेवलची टिंबर मार्ट या ई.एच.व्ही. सबस्टेशनमध्ये सद्य:स्थितीत आवश्यकता दिसून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत अनेक वर्षापासून काम करणाऱ्या ३०५२ कर्मचाऱ्यांना सरळ सेवा भरतीद्वारे कायम करण्याबाबत

**(९) ४८४९ (२१-११-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय खोडके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २००१ मध्ये समग्र शिक्षा (पूर्वी सर्व शिक्षा अभियान) सुरू करुन त्यासाठी विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली असता एकूण ७,४०३ पदांची भरती करण्याचे नियोजन होते, तथापि, त्यातील ५,६८६ पदांची भरती करण्यात आली असून समग्र शिक्षाअभियान अंतर्गत राज्यात गत २०-२५ वर्षांपासून करार पध्दतीने कार्यरत सुमारे ५,४९६ कर्मचारी आजही अत्यल्प मानधनावर सेवा बजावत आहेत. तसेच समावेशित शिक्षण उपक्रमातील २,५७२ कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून

घेण्यात आले असून, उर्वरित सुमारे २,९२४ कर्मचारी अद्यापही सरळ सेवा भरतीद्वारे अद्याप कायम करण्यात आलेले नसल्याने उक्त कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी समिती स्थापन करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले होते, त्यानुसार उक्त विषयावर तीन बैठका घेण्यात आल्या असून दिनांक ०४ सप्टेंबर,२०२५ रोजी झालेल्या बैठकीत उर्वरित कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समावेशाचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यामध्ये उपअभियंता, कार्यक्रम अधिकारी, संगणक प्रोग्रॅमर, सहायक कार्यक्रम अधिकारी, कनिष्ठअभियंता, स्टेनोग्राफर, डाटा एन्ट्री ऑपरेटर आणि सहाय्यक, लिपिक, टंकलेखन,वाहनचालक,नाईक, शिपाई, पहारेकरी, कार्यक्रम अभियंता, जिल्हा समन्वयक, दस्त व संशोधन सहायक, वरिष्ठ लेखा लिपिक, सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, विषय साधन व्यक्ती, एमआयएस समन्वयक इत्यादी विविध पदांवरील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शाळांमधील सेवा, प्रशासकीय अनुभव व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक योगदान लक्षात घेता त्यांना कायम शासन सेवेत कायम करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे, तसेच सर्वशिक्षा अभियानातील अपंग समावेशित शिक्षण या घटकांतील साधन व्यक्ती (अपंग समावेशित शिक्षण) तसेच फिरते विशेष शिक्षकांना कायम करण्यात आले असूनही दिनांक ३० सप्टेंबर,२०२५ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत ३,१०५ कर्मचाऱ्यांना शासनाने कायम केले आहे मात्र, सर्व शिक्षा अभियानातील ३०५२ कर्मचाऱ्यांना अजूनही कायम करण्यात आले नसून यातील अनेक कर्मचारी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर पोहचलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समग्र शिक्षा अभियांनातील उर्वरित कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालय यांनी रिट याचिका क्र. १३२/२०१६ मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता केंद्र स्तरावर एक याप्रमाणे विशेष शिक्षकांचे ४८६० पदे शिक्षकीय उपलब्ध पदांमधून राखीव ठेवण्यात आली आहेत. सदर ४८६० पदांवर समग्र शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत २९८४ कंत्राटी विशेष शिक्षकांना सामावून घेण्याचा निर्णय, दिनांक ०८/१०/२०२४ रोजीच्या मा.मंत्रिमडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

(२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत १८,२९७ पदे असून ३,८६१ कार्यरत पदे आहेत. यापैकी ४७ प्रतिनियुक्तीने, ३३८७ करार कर्मचारी, ५६ अर्धवेळ शिक्षक, ३ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून भरण्यात आलेली पदे व ३६८ पदे बाह्यसंस्थेमार्फत भरण्यात आलेली आहेत.

समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात शिफारशी करण्यासाठी दिनांक २२/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित समितीची प्रशासकीय कारणास्तव शासन निर्णय, दिनांक ०४/०६/२०२५ अन्वये पुनर्रचना करण्यात आली. सदर समितीचा अहवाल शासनास

नुकताच प्राप्त झाला असून, अहवालाची तपासणी / छाननी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील व मौजे धावडा (ता.भोकरदन जि.जालना) येथील शाळांमधील जीर्णावस्थेतील वर्ग खोल्या पाडून नवीन बांधण्याबाबत

**(१०) ४८७० (२१-११-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ५३७ शाळांमधील सुमारे १०७४ खोल्या जिर्ण झाल्या असून उक्त खोल्या दुरुस्ती करण्याच्या स्थितीत नसल्याचे तसेच मौजे धावडा (ता.भोकरदन जि.जालना) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या ५० वर्षांपुर्वीच्या वर्ग खोल्या पूर्णत: मोडकळीस आल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वर्ग खोल्यांच्या छतातून पाणी गळणे व भितींना तडे जाणे, दरवाजे –खिडक्या पूर्ण निकामी झाल्या असून विद्यार्थ्यांना खोल्यांमध्ये भितीदायक वातावरणात बसावे लागत आहे, तसेच मौजे धावडा हे गाव जिल्हा परिषद सर्कलचे मोठे गांव असल्याने गावातील व परिसरातील विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने विद्यार्थ्यांस बसण्यास वर्ग खोल्या उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्रशासनाने १०७४ वर्ग खोल्या दुरुस्तीसाठी रुपये ३८ कोटी तर नवीन १४६० खोल्या बांधकामासाठी रुपये ७० कोटी चा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठवला असून मौजे धावडा (ता.भोकरदन जि.जालना) येथील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या पाडण्यासाठी जिल्हा परिषदेने दिनांक १७ जूलै २०२५ रोजी वा त्यादरम्यान मान्यता दिली, परंतु सदर खोल्या पाडून दुसऱ्या खोल्या बांधण्यासाठी जि.प.प्रशासनाने कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तसेच मौजे धावडा (ता.भोकरदन जि.जालना) येथील शाळांमधील जीर्णावस्थेतील वर्ग खोल्या तात्काळ पाडून तेथे नवीन वर्ग खोल्या बांधण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील ५३७ शाळांमध्ये १,४६० नवीन वर्गखोल्यांची आवश्यकता असल्याबाबत प्रस्ताव प्राप्त आहेत. तसेच १,०७४ शाळांना दुरुस्तीच्या कामांची आवश्यकता असल्याबाबत जिल्हा परिषद शाळांनी प्रस्ताव सादर केलेले आहेत. पैकी शाळा दुरुस्तीसाठी २५५ शाळांचा रुपये १५००.००लक्ष इतक्या किंमतीचा व पायाभूत सुविधा निर्मितीसाठी २२० शाळांचा रुपये २६८१.६० लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला होता.प्राप्त

तरतुदीमधून जिल्ह्यातील १२४ जिल्हा परिषद शाळांमध्ये दुरुस्तीची रुपये ४५०.००लक्ष इतक्या किंमतीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत तर ७१ शाळांमध्ये १५६ नवीन वर्गखोली बांधकाम व इतर पायाभूत सुविधेची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. पायाभूत सुविधेच्या कामांसाठी रुपये १८३८.५०लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

जालना जिल्ह्यातील जि.प. प्राथमिक शाळा, धावडा ता.भोकरदन या शाळेत मान्य शिक्षक संख्या ६, कार्यरत शिक्षक ६, विद्यार्थी संख्या १४४ व सुस्थितीतील वर्गखोल्या ७ आहेत. सदरच्या सुस्थितीतील वर्गखोल्या ह्या विद्यार्थी व शिक्षक संख्येच्या प्रमाणात आहेत. या व्यतिरिक्त २ वर्गखोल्या मोडकळीस असून सदर वर्गखोल्या पाडण्यासाठी जि.प. सर्वसाधारण सभा दिनांक ३०/११/२०११ चा ठराव क्र. ३४४ व दिनांक १७/०७/२०१२ ठराव क ३९० नुसार मंजूर झालेला आहे. दिनांक १२/०८/२०२५ रो ग्रामपंचायत धावडा यांना सदरील वर्गखोली पाडणेसाठी पत्र देऊन कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## नागपूर जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांच्या निवृत्तीवेतन व इतर थकित अनुदानाच्या वितरणाबाबत

**(११) ४८९२ (२१-११-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंशतः अनुदानित शाळेतील अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतनापासून वंचित राहिले असून नागपूर जिल्हा परिषदेतील ४०० पेक्षा अधिक सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे सेवा उपदान, अंशराशीकरण, गट विमा योजनेचे एकूण रुपये १०० कोटी पेक्षा अधिक रकमेचे अनुदान गेल्या दीड वर्षापासून शासनाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यंत हलाखीचे जीवन जगणाऱ्या या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत तसेच नागपूर जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवा उपदान, अंशराशीकरण, गट विमा योजनेचे एकूण रुपये १०० कोटी पेक्षा अधिक रकमेचे थकित अनुदान शिक्षकांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-१२-२०२५) :** (१), (२) व (३) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने शिक्षण संचालनालयामार्फत प्राप्त मागणीस अनुसरुन पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधित लाभ अदा करण्याचे नियोजित आहे.

## विदर्भ जलसिंचन विकास महामंडळाच्या गोसीखुर्द प्रकल्पातील नियमबाहय आगाऊ रकमेच्या प्रस्तावामुळे झालेल्या आर्थिक तोटयाबाबत

**(१२) ४८९४ (२१-११-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागांतील गोसीखुर्द प्रकल्पामध्ये विदर्भ जल सिंचन विकास महामंडळाच्या गोसीखुर्द प्रकल्पाचे प्रभारी अधिकाऱ्यांनी हिन्दुस्थान कंस्ट्रक्शन कंपनीला नियमबाहय पध्दतीने १०.४९ कोटी रूपयांचे आगाऊ रकमेचे प्रस्ताव दिले असून, याव्यतिरिक्त अन्य कारनाम्यांमुळे सदर अधिकाऱ्यांमुळे शासनास अंदाजे रुपये ७८१ कोटी रूपयांचा तोटा झाल्याचा प्राथमिक अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याप्रकरणाची गंभीर दखल घेतली असूनही शासनाने अद्याप संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हिन्दुस्थान कंस्ट्रक्शन कंपनीला नियमबाहय पध्दतीले १०.४९ कोटी रुपयांचे आगाऊ रकमेचे प्रस्ताव देणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (०५-१२-२०२५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अधिनियम १९९७ मधील कलम १९ आय मध्ये अग्रिम देण्याची तरतूद असून गोसीखुर्द प्रकल्पाचे घोडाझरी शाखेच्या सा.क.८८०० मी. १३३३५ मी. चे मातीकाम व कटकव्हरचे कामाबाबत कंत्राटदार मे. हिंदुस्थान कंस्ट्रक्शन कंपनी यांना दिनांक २६/०२/२००७ च्या महामंडळाच्या आदेशान्वये सुसज्जता अग्रिम रुपये १०.४९ कोटी देण्यात आले आहे. सदर अग्रिम व त्यावर १२.२० टक्के प्रमाणे रुपये १.२२ कोटी व्याज वसूल करण्यात आले आहे.

सदर कामाची निविदा किंमत सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार रुपये ९१.१८ कोटी होती. त्यावर निम्नतम देकार २०.७५ टक्के अधिक होती. त्यानुसार रुपये ११०.०९ कोटी इतक्या रक्कमेस निविदा मंजूर करून करारनामा करण्यात आला. सदर निविदा मंजूर करताना अद्यावत किंमत काढतांना दरसुचीतील बदलामुळे रुपये ५८९.९४ लक्ष (६.४७टक्के), व्हॅट रुपये ८३.०७ लक्ष, इन्शुरन्स रुपये ६३.४२ लक्ष, केंद्रिय जल आयोगाप्रमाणे लेबर ॲमेनिटीज रुपये ६३४.८४ लक्ष असे इतर कामासाठी एकूण रुपये ७८१.३९ लक्ष (८.५७ टक्के) चा समावेश होता.श्री.संजय खोलापुरकर, तत्कालीन अधीक्षक अभियंता यांचे विरुध्द दिनांक ३१/०७/२०१८ रोजी लाचलुचपत विभागातर्फे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. मा.स्पेशल न्यायमुर्ती (ACB) नागपूर यांनी गुन्हा क्र. २०४/२०१७ व केस २६/२०१८ मध्ये दिलेल्या आदेशाच्या विरोधात श्री.खोलापुरकर यांनी केलेला विनंती अर्ज क्र. २४६/२०२३ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक ०२/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये सदर रक्कम ७८१ कोटी दर्शविण्यात आली आहे, परंतु सदर रक्कम प्रत्यक्षात ७८१ कोटी नसून ७८१ लक्ष असल्याचे दिसून येत आहे. श्री.खोलापूरकर यांचे अपील १८७०८/२०२५ च्या अनुषंगाने दिनांक २८/११/२०२५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयावर स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(२) होय, हे खरे आहे.

या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल झाला असून उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) या प्रकरणी वडनेरे समितीचे चौकशी अहवालाचे संदर्भाने विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण होऊन दोषी अधिकाऱ्यांना शिक्षा देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जुन्या व नव्या आल्याच्या खरेदी आदेशाची अंमलबजावणी होण्याबाबत

**(१३) ४९५३ (२१-११-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दोन वर्षापूर्वीच जुन्या आणि नव्या आल्याची (अदरक) सरसकट खरेदी करण्याचे आदेश काढलेले असतानाही आदेशाची पायमल्ली व्यापाऱ्यांकडून केली जात असल्याचे माहे सप्टेंबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापारी शेतकऱ्यांना जुन्या आल्याला (अदरक) ३२ ते ३६ रुपये किलो, तर नवीन आल्याला (अदरक) फक्त १२ रुपये किलो दर देत असल्याने व्यापाऱ्यांकडून प्रतवारीच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट सुरु असल्याने व उत्पादन खर्च निघत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासन आदेशानाचे पालन न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच एकत्रित आले (अदरक) खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्य.) भंडारा यांच्या नियमबाह्य व अनियमित प्रकरणांची चौकशी करण्याबाबत

**(१४) ५२२६ (२१-११-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्य.) भंडारा यांच्या नियमबाह्य व अनियमितता प्रकरणाच्या झालेल्या तक्रारीनंतर संचालक (माध्य.) पूणे यांच्या पत्रानुसार चौकशी समिती नेमण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी समिती नेमली असताना त्यांचा कार्यभार काढण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चौकशी समितीने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्य.) भंडारा यांनी केलेल्या नियमबाहय व अनियमितीतेच्या प्रकरणांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (०९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) याप्रकरणी दिनांक ३०/०९/२०२५ अन्वये चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशी समितीची कार्यवाही प्रगतीपथावर असून अद्यापि चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नक्षलग्रस्त व आदिवासी भागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत

**(१५) ५२३४ (२१-११-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नक्षलग्रस्त/आदिवासी भागामध्ये कार्यरत शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता हा पाचव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या १५% किमान २०० रुपये व कमाल १५०० रुपये या मर्यादेत देण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागामार्फत कार्यरत अधिकारी - कर्मचारी यांना सहाव्या, सातव्या वेतन आयोगातील मूळ वेतनावर १५% सुधारित दराने प्रोत्साहन भत्ता थकबाकीसह देण्याबाबत दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी पत्र निर्गमित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विभागाच्या धर्तीवर नक्षलग्रस्त / आदिवासी भागातील शालेय शिक्षण विभागामध्ये कार्यरत शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १५% प्रोत्साहन भत्ता दिनांक ०१ जानेवारी, २००६ पासून सहाव्या व दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून तसेच सातव्या वेतन आयोगानुसार असलेल्या मूळवेतनावर किमान २०० रुपये व कमाल १५०० रुपये या मर्यादेत लागू करण्यात यावा व थकबाकीसह अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०६/०८/२००२ नुसार केवळ नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रूपये २०० व कमाल रूपये १५०० दरमहा या मर्यादेत प्रोत्साहनभत्ता अनुज्ञेय आहे.

या अनुषंगाने, नक्षलग्रस्त /आदिवासी भागातील शालेय शिक्षण विभागामध्ये कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १५% इतका प्रोत्साहन भत्ता ०१/०१/२००६ पासून सहाव्या व ०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगानुसार असलेल्या मूळ वेतनावर किमान २०० रूपये व कमाल १५०० रूपये या मर्यादेत लागू करण्याकरीता व थकबाकीसह अदा करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शालार्थ आयडी गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१६) ५२३५ (२६-११-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १३५ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नावाने बनावट शालार्थ आयडी घोटाळ्यातील सुत्रधार यांनी शासनाची सुमारे ३०० कोटी रुपयांची फसवणूक करुन नागपूरसह विविध ठिकाणी मालमत्ता खरेदी केल्या असून सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाच्या वतीने विषेश तपास समिती (एसआयटी) नेमण्यात आली आहे तसेच मुंबई शालेय शिक्षण विभागातील या गैरव्यवहारातील आरोपी शिक्षण उपसंचालक, यांचे निलंबन करुन त्यांची विशेष तपास समिती (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, बोरीवली यांनी केली असून तीन महिने उलटूनही अद्याप सदर उपसंचालक यांची विशेष तपास समिती (एसआयटी) मार्फत चौकशी करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील १२ शाळांतील अनुदान घोटाळ्याची २०१७ साली चौकशी करण्यात आली असून या शाळांनी सन २०१४ ते २०१७ या कालावधीत जवळपास ३ कोटी रुपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले असून या शाळांवर आजमितीपर्यंत कोणतीही कारवाई झाली नसल्याची आणि या शाळांचे वेतन अनुदान अद्यापही तसेच सुरू असल्याची त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात राज्यभरातील विविध जिल्ह्यांमध्ये बनावट दस्तऐवज, अपात्र उमेदवारांच्या बोगस नियुक्त्या आणि शासनाच्या निधीचा अपहार झाल्याच्या आरोपांमुळे आर्थिक फसवणूक झाली असल्याने या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने विभागीय आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली त्रिसदस्यीय राज्यस्तरीय एसआयटीची स्थापना करण्यात आली असून राज्यातील मुंबईसह सन २०१२ पासूनच्या शालार्थ घोटाळयाबाबतची चौकशी करण्यात येणर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, शालार्थ ओळखपत्र घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्याच्या शिफारसी केल्या आहेत, तसेच या शिक्षक घोटाळ्यातील अटकेतील अधिकाऱ्यांना आजपर्यंत शासन सेवेतून बडतर्फ न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, चौकशी समितीच्या अहवालाच्या शिफारशींच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नावाने बनावट शालार्थ ओळखपत्रांद्वारे शासनाची सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर तसेच मुंबई विभागातील शिक्षण उपसंचालक यांच्यावर निलंबन करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली तसेच समितीने शालार्थ प्रणालीमध्ये सुधारणा, ओळखपत्रांच्या सत्यतेसाठी नव्या डिजिटल यंत्रणा, आणि शिक्षकांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी कोणत्या धोरणात्मक उपाययोजना सुचविल्या आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) विशेष चौकशी पथकाकडून याप्रकरणी अद्यापही अंतिम चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आलेला नसून त्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) [१] विशेष चौकशी पथकाकडून याप्रकरणी अद्यापही अंतिम चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आलेला नाही.

[२] तसेच, मा.श्री.संजय उपाध्याय, वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना व प्राप्त विविध तक्रारींच्या अनुषंगाने श्री.संदीप संगवे, तत्कालिन विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांची चौकशी करण्यासाठी शिक्षण आयुक्तालयाच्या दिनांक ११/०७/२०२५ पत्रान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशीच्या अनुषंगाने श्री.संगवे यांना शासन आदेश दिनांक २१/०७/२०२५ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते, परंतु अद्यापि शिस्तभंगविषयक कारवाई सुरू करण्यात आलेली नाही.

[३] शालार्थ आयडी प्रदान करताना पारदर्शकता येण्यासाठी आधार लिंक्ड मोबाईल ओटीपी चा वापर, ई-ऑफिस प्रणालीचा वापर, संच मान्यतेसाठी एपीआयचा वापर करुन शाळानिहाय पोस्ट मॅपिंग प्रक्रिया इ. चा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच, याअनुषंगाने शालार्थ आयडी प्रदान करताना अनुसरावयाच्या कार्यपध्दती संदर्भात शिक्षण आयुक्तालयाचे परिपत्रक दिनांक २१/०३/२०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुधागड पाली (जि.रायगड) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) ५४२६ (२१-११-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड पाली (जि.रायगड) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीतील अनेक वर्गांचे छत गळणे, स्लॅबला तडे गेलेले असणे, शौचालयात पाणीपुरवठा बंद असणे, भिंती पूर्णपणे ओल्या झाल्यामुळे विजेच्या शॉकचा धोका सतत निर्माण होत असणे, आदी समस्या निर्माण झाल्या असून या समस्यांमुळे संस्थेच्या इमारतीत मोठ्या प्रमाणात शॉर्ट सर्किट झाल्याची घटना घडली असता प्रसंगावधान राखत सर्व विद्यार्थ्यांना तात्काळ वर्गाबाहेर काढण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीची तात्काळ दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०५-१२-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीतील काही वर्गांना छत गळण्याची समस्या आहे. संस्थेच्या इमारतीत ओलाव्यामुळे दिनांक १३/१०/२०२५ रोजी एकदाच शॉर्ट सर्किट झाल्याची घटना घडली होती. प्रसंगावधान राखत सर्व विध्यार्थांना तात्काळ वर्गाबाहेर काढण्यात आले.
(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीची तात्काळ दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने सदर कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रिक मंजुरी दिली आहे. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी रायगड-अलिबाग यांनी दिनांक ०७/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, रायगड-अलिबाग यांचेकडे सदर बांधकामासाठी रुपये १,१२,७३,७७२/- इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत जिल्हा नियोजन समितीकडे कार्यवाही सुरु आहे.
(४) लागू नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदेच्या केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांच्यावर प्रस्तावित शिस्तभंगाच्या कारवाईबाबत

**(१८) ५४९८ (२४-११-२०२५) श्री.अमित गोरखे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रस्तरावरुन मागविण्यात येणाऱ्या विविध माहितीचे सादरीकरण अपूर्ण, विलंबित किंवा काही शाळांकडून येत नसल्याच्या अनेक तक्रारी येत असून याचा परिणाम जिल्हा परिषदेच्या शाळेच्या कामकाजावर होत असल्याने पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेने शासकीय उपक्रमांवरील माहिती वेळेवर सादर न करणाऱ्या संबंधित केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्याचे पत्र प्राथमिक शिक्षणाधिकारी, पुणे यांनी निर्गमित केले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थांची सुरक्षा माहिती पोर्टलवर अपलोड करणे, निर्भय महाराष्ट्र मुल्यांकन १०० टक्के पूर्ण करणे, स्वच्छ व हरित विद्यालय माहिती भरणे, एक पेड माझे नाव उपक्रमांचे फोटो पोर्टलवर अपलोड करणे, विकसित भारत अंतर्गत नोंदणी करणे, युध्दिजय स्पर्धेतील त्रुटी दुरुस्ती करणे व विद्यार्थ्यांची संख्या शून्य ठेऊ नये, विद्यार्थी पटांचे निरिक्षण १०० टक्के पूर्ण करणे आदीं उपक्रम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी आणि मुख्याध्यापकांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त उपक्रमाची माहिती अपलोड करण्यासाठी शिक्षकांना कोणताही सहाय्यक दिला नसल्याने शिक्षकांना शिकविण्याचे काम सोडून उक्त कामे करावी लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे शिक्षकांकडून सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) केंद्र शासन व राज्य शासनाचे विविध उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक प्रशासनाच्या सुलभततेसाठी आहेत, याची माहिती संबंधित पोर्टलवर अपलोड करणे हे प्रशासकीय स्वरुपाचे काम असून विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांच्या कार्यकर्तव्याचा तो भाग आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात हमीभाव खरेदी केंद्र सुरू झाली नसलेबाबत

**(१९) ५८४६ (२१-११-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.संजय केणेकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात या वर्षी झालेल्या अतिवृष्टी आणि अनियमित पावसामुळे खरीप हंगामातील उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले असताना अकोला जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या आधारभूत किंमतीत ५,३२५ रुपये प्रित क्विंटलप्रमाणे सोयाबीन खरेदी तातडीने सुरु करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रितनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, तसेच सोलापूर जिल्ह्यात केंद्र सरकारने खरीप हंगाम २०२५- २६ साठी विविध पिकांचे हमीभाव जाहीर केले असले,तरी अद्यापही हमीभावानुसार शेतमाल खरेदी करण्यासाठी कोणतीही केंद्रे अद्याप सुरू करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दरात सोयाबीन,मूग,ऊडद,तूर, मका इत्यादी पिके विकावी लागत असल्याने त्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या सोयाबीन काढणीला वेग आला असला तरीही हमीभाव केंद्राचे अद्याप शासनाने कोणतेही नियोजन न केल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली उत्पादित केलेल्या शेतमालाला हमीभाव मिळावा यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी हमीभावाने शेतमाल खरेदी केला जातो यावर्षी सोयाबीन, मुग,उडीद, मका,तूर या शेतमालाची हमीभावाने खरेदी होणार असून या खरेदी प्रक्रियेत शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून पारदर्शकता व गतीने खरेदी प्रक्रिया राबविण्याचे नियोजन करण्याच्या सूचना पणन मंत्री महोदयांनी विभागाला दिल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोयाबीनला व्यापाऱ्यांकडून केवळ ३००० ते ३५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५–२६ साठी कोणत्या तालुक्यांमध्ये आणि किती ठिकाणी हमीभाव खरेदी केंद्रे सुरू झाली आहेत तसेच सोयाबीन थोडे ओलसर असल्याने उशिराने खरेदी केंद्रावर येऊ शकते त्यामुळे सोयाबीन खरेदीची मुदत वाढविण्याचा निर्णय घ्यावा अशीही मागणी करण्यात आली असून हमीभावाविना १,२२८ रुपये या दरात सोयाबीन विक्री करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असून सदर प्रक्रियेचे नियोजन

करताना नोंदणी पासून ते चुकारे मिळेपर्यंत सर्व प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी काटेकोर व पारदर्शक रचना झाल्यामुळे सोयाबीन खरेदीसाठी हमीभाव नोंदणी केंद्रे सुरु करुन खरेदी प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात शासनाने माहिती घेवून व नियोजन करुन सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५-२६ साठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या हमीभावानुसार खरेदी केंद्रे सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली तसेच मागील खरीप हंगामात (२०२४–२५) सोलापूर जिल्ह्यात किती प्रमाणात आणि किती शेतकऱ्यांचा शेतमाल हमीभावावर खरेदी करण्यात आला होता, याची तालुकानिहाय माहिती देण्यात यावी.

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय अहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राज्यात सोयाबीन, उडिद व मूग खरेदीसाठी केंद्र शासनाच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. त्याकरीता नाफेड/एनसीसीएफ मार्फत ०४ डिसेंबर,२०२५ अखेर ५५७ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

अकोला जिल्ह्यात १६ व सोलापूर जिल्ह्यात एकूण १४ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून सोयाबीन खरेदी प्रक्रीया सुरू आहे.

(२) हे खरे आहे.

राज्यातील हमीभाव खरेदी प्रक्रीया सुरळित व पारदर्शक पध्दतीने व्हावी याकरीता शासन स्तरावरून आढवा बैठकींचे आयोजन करून आवश्यकतेनुसार संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) किमान आधारभूत योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ मध्ये हमीभाव खरेदीसाठी आतापर्यंत ५५७ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून खरेदी प्रक्रीया सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यात १४ खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली असून आतापर्यंत ३१७८ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे.

तसेच हमीभाव खरेदी प्रक्रियादरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने तसेच खरेदी केंद्रावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये राज्यस्तरीय,जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय दक्षता पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) हंगाम २०२५-२६ साठी हमीभाव खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली असून सोलापूर जिल्ह्यात नॅशनल को.ऑप कंन्झुमर फेडरेशन या केंद्रीय नोडल संस्थेच्या वतीने आतापर्यंत १४ खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली आहे.

हंगाम २०२४-२५ मधील सोलापूर जिल्ह्यात हमीभाव खरेदी केंद्रांवरील शेतमालाची तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | खरेदी केंद्र | खरेदी केंद्र | लाभार्थी शेतकरी | खरेदी क्विं. |
|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकोट | ०२ | ३७४ | ६८८२.८३ |
| २ | माळशिरास | ०१ | ०० | ०० |
| ३ | बार्शी | ०२ | १९२६ | ३८४८१ |
| ४ | करमाळा | ०१ | ०० | ०० |
| ५ | माढा | ०२ | १००७ | १९३१४ |
| ६ | मंगळवेढा | ०१ | ०० | ०० |
| ७ | सोलापूर उत्तर | ०१ | २१४ | ५०२१.५ |
| ८ | पंढरपूर | ०१ | ९७ | २०९३.५ |
| ९ | सोलापूर दक्षिण | ०१ | ०० | ०० |
| | एकूण | १२ | ३६१८ | ७१७९२.८३ |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतकऱ्यांना पेरणी ते विक्री या प्रक्रियेतील मार्गदर्शन आणि समन्वयासाठी कृषी दल स्थापन करण्याबाबत

**(२०) ५८९२ (२६-११-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिकांची पेरणी ते शेतमाल विक्रीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया अधिक सुलभ, समन्वयित व प्रभावी करण्यासाठी कृषी व पणन विभागाच्या कृती दलाची स्थापना करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना या कृती दलाद्वारे पेरणी ते विक्रीपर्यंत मार्गदर्शन मिळाल्याने शेतीचे उत्पन्नात वाढ होऊन शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत होईल असे कृषी मंत्री व पणन मंत्री महोदयांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत घोषित केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेतामध्ये कोणते पीक घेतल्यास अधिक लाभ होईल याबाबत कृषी व कृषी पणन विभागाकडून संयुक्त मार्गदर्शन करण्यात येणार असून, त्याचबरोबर विकेंद्रीत गोदामांची कामे पूर्ण करणे, २२ जिल्ह्यात ३५ ठिकाणी गोदाम उभारण्याचा प्रस्ताव असणे तसेच पिकांची निर्यात सुलभ व्हावी यासाठी आवश्यक असलेला पेपर हिट ट्रीटमेंट प्रकल्पाची क्षमता वाढविण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने विकेंद्रीत गोदामांची कामे पूर्ण करणे, २२ जिल्ह्यात ३५ ठिकाणी गोदाम उभारण्याचा प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन(स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमामध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ सहभागी असून सदर प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रामध्ये ४ ठिकाणी विकेंद्रीत गोदामांची निर्मिती करण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यातील कांचनी फार्मर प्रोडयुसर कंपनी चिनोरा, ता.वरोरा, जि.चंद्रपूर, सोनपाऊल ॲग्रो प्रोडयुसर कंपनी, अंजुनी खुर्द जि.बुलढाणा, आनंदरावदादा ॲग्रो प्रोडयुसर कंपनी, बेलेवाडी जि.कोल्हापूर या ३ ठिकाणी गोदामांचे बांधकाम १०० टक्के पूर्ण झाले असून, नॅचरल फार्म ॲग्रो प्रोडयुसर कंपनी, कोल्हापूर येथील गोदामाच्या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक २४/०२/२०२५ रोजी देण्यात आले असून कामकाज अंतिम टप्प्यात आहे. इतर २२ जिल्ह्यात ३५ ठिकाणी गोदाम उभारण्याचा प्रस्ताव दिनांक २२/०४/२०२५ रोजी प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प यांच्याकडे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत सादर करण्यात आला आहे. पिकांची निर्यात सुलभ व वेगवान होण्याकरीता आवश्यक असलेल्या व्हेपर हिट ट्रिटमेंट (VHT) प्रकल्पाची क्षमता वाढविण्यासाठी जागतिक बँक सहाय्यित मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत बापगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे येथे नवीन व्हेपर हिट ट्रिटमेंट (VHT) प्रकल्प उभारणीसंदर्भात कामकाज सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.